


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध,अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ९२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.१४ नोव्हेंबर २०२४

## ‘कार्तिकी’निमित्त शेगावात भाविकांची मांदियाळी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, बुलडाणा :** विदर्भ पंढरी शेगाव येथील श्री गजानन महाराज संस्थानासह श्री क्षेत्र पंढरपूर शाखेत कार्तिक एकादशी सोहळा पारंपरिक उत्साहात साजरा झाला. कार्तिकीनिमित्त संतनगरी शेगावात हजारो आबालवृद्ध भाविकांची मांदियाळी दिसून आली. श्रींचे मंदिरात ५० हजाराचेवर भाविकांनी समाधीचे दर्शन घेतले. ३० हजारावर भक्तांनी संस्थानच्या मोफत महाप्रसादाचा लाभ घेतला.

श्रीं च्या दर्शनासाठी प्रत्यक्ष दर्शन आणि मुख दर्शनासाठी जिल्ह्यासह दूरवरून आलेल्या भाविकांच्या पहाटे पासून दीर्घ रांगा लागल्याचे दिसून आले. आषाढी आणि कार्तिकी एकादशीला पंढरपूरला जाऊ न शकणारे भाविक शेगावी येऊन गजानन महाराजांचे दर्शन घेतात. यंदाही ही परंपरा कायम राहिली. दूरवरून येणाऱ्या भाविकांच्या निवासाची आणि महाप्रसादची शेगाव संस्थांनच्या



वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती. भाविकांच्या सुविधेसाठी शेकडो सेवेकरी तैनात करण्यात आले होते. शेगाव शहर पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

**पंढरपूर शाखेत सव्वा लाख भाविकांना महाप्रसाद**

श्री क्षेत्र पंढरपूर शाखेव्दारा श्री गजानन महाराज मठामध्ये दशमी, एकादशी व बारस या कालावधीत १ लाख १९ हजारावर भक्तांना महाप्रसाद वितरीत करण्यात आला. तसेच वारी निमित्त पंढरपूर शाखेत आलेल्या ७४ दिंड्यांपैकी नियमाची पूर्तता केलेल्या ७० भजनी दिंड्यांना भजन साहित्यासह वाद्यांचे वितरण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे वारीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांसाठी धर्मार्थ ॲलोपॅथीक रूग्णालयाचे माध्यमातून ६००० भाविकांनी आरोग्य सेवेचा लाभ घेतला आहे. आतापर्यंत संस्थेव्दारा शेगांव, पंढरपूर, आळंदी व त्र्यंबकेश्वर या तीर्थक्षेत्री महाराष्ट्रासह गोवा, कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश, उत्तराखंड, तेलंगणा अशा ९ राज्यामधील ७७ जिल्ह्यातून आलेल्या २० हजार १७७ गावांना भजनी साहित्य वितरण करण्यात आले आहे. शाखेत भाविकांसाठी भक्तनिवासात निवास व भोजनप्रसादाची व्यवस्था कार्यरत आहे. शिवाय रात्री उशीरा येणाऱ्या भक्तांसाठी सुद्धा महाप्रसादाचे विनामुल्य वितरण करण्यात येते.

तसेच श्री प्रगटदिन, श्रीरामनवमी व श्री ५०० विद्यार्थ्यांना दररोज माधुकरीचे वितरण देखील करण्यात येते. कार्तिक व आषाढी वारीचे वेळेस महाराष्ट्रासह परराज्यातून आलेल्या व नियमांची पूर्तता केलेल्या भजनी दिंड्यांना १० टाळजोड, १ विणा, १ मृदंग, १ हातोडी असे भजनी साहित्य व श्री ज्ञानेश्वरी, श्री तुकाराम महाराज गाथा व श्री एकनाथी भागवत या संत वाद्यांचे वितरण करण्यात येते.

## पक्ष उभा करण्यास अक्कल लागते, फोडण्यास नाही : फडणवीसांना टोला

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, राहुरी (अहिल्यानगर) :** कोणताही पक्ष उभा करण्यासाठी अक्कल लागते, पण तो फोडण्यासाठी काहीच अक्कल लागत नाही,अशा तिखट शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे. शरद पवार यांची आज अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथे प्रचारसभा झाली.

त्यात शरद पवार यांनी राज्यातील फोडाफोडीच्या मुद्यावरून देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून टीका केली. ते म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ३०- ४० आमदार गोळा केले आणि गुवाहाटीला जाऊन बसले. त्यांनी उद्धव ठाकरे यांचे सरकार पाडले. लोकांना त्यांची भूमिका पटली नाही. हे शिंदे स्वतः देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात मंत्री होते. उद्धव ठाकरे यांच्याही सरकारमध्ये ते होते. त्यानंतरही त्यांनी बंडखोरी केली. एखाद्या पक्ष फोडून सत्ता मिळविणे ही लोकशाही आहे का ? देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः आपण ही फोडाफोडी केल्याचे मान्य केले आहे. कोणताही पक्ष उभा



करण्यासाठी मोठी अक्कल लागते, पण तो फोडण्यासाठी काहीच अक्कल लागत नाही हे त्यांनी लक्षात घ्यावे. लोकसभा निवडणूकीच्या प्रचारावेळी मी राहुरीला आलो होतो. त्यानंतर तुम्ही आपला उमेदवार निवडून दिला. त्याबद्दल तुमचे आभार. मागच्या लोकसभेला काँग्रेसचा १ व आमचे ४ खासदार होते. पण संविधान संकटात सापडल्यामुळे तुम्ही यावेळी आमचे ३१ खासदार निवडून दिले. आता राज्यात भाजप व आमच्यातल्या फुटून गेलेल्या काही लोकांचे राज्य आहे,असे शरद पवार म्हणाले.

**भाजपला सत्तेत बसण्याचा अधिकार नाही**

शरद पवार यांनी यावेळी भाजपला सत्तेत बसण्याचा कोणताही अधिकार नसल्याचेही ठणकावून सांगितले. ते म्हणाले, लोकसभा निवडणुकीत आम्ही सत्ताधारी एनडीए विरोधात इंडिया आघाडी स्थापन केली. कारण, मोदींनी ४०० पारचा नारा देत देशाचे संविधान बदलण्याचा डाव रचला होता. पण तो डाव महाराष्ट्रातील जनतेने हाणून पाडला. त्यांनी आम्हाला राज्यातील लोकसभेच्या ४८ पैकी सर्वाधिक ३१ जागा दिल्या. यामुळे सत्ताधारी महायुतीची चिंता वाढली. यावर उपाय म्हणून त्यांनी नवनवीन योजना आणल्या. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांची अंमलबजावणी केली. पण आज महाराष्ट्रात महिला सुरक्षित नाहीत. अनेक बहिणी बेपत्ता आहेत. त्यानंतरही तुम्ही लाडकी बहिण म्हणता ? महाराष्ट्रात मागिल वर्षभरात ११०० हून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. शेतकऱ्यांच्या हाती आलेले पीक वाया गेले. यामुळे त्यांना कर्जाची परतफेड करता आली नाही. आता त्यांच्या शेतमालालाही रास्त भाव मिळत नाही. त्यामुळे ते घटाघटा विष पिऊन आत्महत्या करत आहेत. त्यामुळे भाजपला सत्तेत बसण्याचा कोणताही अधिकार नाही, असे ते म्हणाले.

## पारनेमध्ये राष्ट्रवादीच्या घड्याळाची टिकटिक वाजणार की तुतारी ?

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, पारनेर (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर जिल्ह्यातील महत्त्वाच्या विधानसभा मतदारसंघांपैकी एक असलेल्या पारनेरमध्ये यंदा पुन्हा दोन मातब्बर नेत्यांच्या लढतीमुळे वातावरण तापले आहे. जिल्हा परिषद सदस्या राणीताई लंके व सभापती काशिनाथ दाते यांनी दंड थोपटले आहेत. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर राज्याबरोबरच या जिल्ह्यातील राजकारणाची सगळी संदर्भ बझलली आहेत. गेल्या विधानसभेपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेले खा. निलेश लंके हे अनेक आमिषे, प्रलोभने असतानाही शरद पवारांशी एकनिष्ठ राहिले. तर काशिनाथ दाते यांनी सेनेतील फुटीनंतर शिंदे गटात आणि उमेदवारी मिळविण्यासाठी अजित पवार यांच्या पक्षात प्रवेश करत हाती घड्याळ बांधून घेतले. त्यामुळे असली व नकली राष्ट्रवादी मध्येच खरी झुंज होत असून घड्याळाची टिकटिक वाजते की तुतारी ? याबद्दल सर्वांनाच उत्सुकता लागून राहिलेली आहे. या ठिकाणी माजी आमदार विजयराव औटी, संदेश कार्ले, विजय सदाशिव औटीसह अन्य अपक्ष ही रिंगणात आहे. मात्र त्यांचा दुरंगी लढतीवर फारसा परिणाम होताना दिसत नाही. राजकीय दृष्ट्या या मतदारसंघाला विशेष महत्त्व आहे. या तालुक्याला सेनापती बापट व जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या सारख्या विचारांचा तालुका म्हणून ओळखला जात आहे. पारनेर २२४ हा सुरवातीच्या काळात कम्युनिस्ट आणि काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला होता. मात्र त्या नंतर शिवसेनेच्या भगव्याचे या ठिकाणी वर्चस्व राहिले. या विधानसभा मतदारसंघावर काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या आमदारांचे प्राबल्य असतानाही माजी आमदार विजयराव औटी यांनी सलग तीन वेळा या मतदारसंघात विजय मिळविण्याची किमया साधली होती. या मतदारसंघात नगर तालुक्यातील गावांसह पाच जिल्हा परिषद गट आहेत. पारनेरमध्ये विजयराव औटी यांचा पराभव करणे ही २०१९ पर्यंत अशक्यप्राय बाब मानली जात होती. विजयराव औटी यांचे शिष्य निलेश लंके हे शिवसेनेमध्ये असतानाच प्रचंड लोकप्रिय झाले होते. शरद पवारांनी त्यांना शिवसेनेतून आपल्या पक्षात घेतले. आणि पारनेर विधानसभा मतदारसंघातून रिंगणात उतरले. तरीही ते विजयराव औटी यांच्यासमोर टिकाव धरू शकतील का, याबाबत शंका होती. मात्र,त्या निवडणुकीत औटी यांची एक चूक त्यांना भोवल्याचे सांगितले जाते. प्रचारादरम्यान त्यांनी विजयराव औटी यांच्या तापट स्वभावाचा उल्लेख केला. त्यामुळे मतदारांची निलेश लंके यांना सहानुभूती वाढली आणि ते आमदार व खासदारकीला लंके जायंट किलर ठरले. अहमदनगर दक्षिण लोकसभेचे खासदार निलेश लंके यांच्या पत्नी राणी लंके या मतदारसंघात महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार आहेत. आमदारकी नंतर माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या विरोधात खासदार झालेले निलेश लंके यांच्या पत्नी राणी लंके हे काशिनाथ दाते यांच्यापेक्षा काहीसे वरचढ ठरताना दिसतात. महायुती राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार काशिनाथ दाते यांना माजी खा. डॉ सुजय विखे यांच्या लोकसभेचा पराभवाचा वचपा काढण्यासाठी राधाकृष्ण विखे पाटील हे त्यांच्याबरोबर आहेत. महायुतीचे तालुक्यातील सर्व नेत्यांची व इतर घटक पक्षाचे नेते दाते यांना कितपत साथ देतात हे देखील या निवडणुकीत दिसून येणार आहे. या मतदारसंघात पारनेर,निघोज, ढवळपूरी, वनकुटे, भाळवणी, टाकळीढोकेश्वर, कान्हुरपठार सुपा या औद्योगिक क्षेत्राचा समावेश होतो. या मतदारसंघात पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग न्यायाच्या प्रतीक्षेत आहे. याशिवाय, या मतदारसंघात सहकार हा मुद्दा ऐरणीवर आला आहे. यावरून राजकारण रंगले होते परंतु निवडणूकित सहकारातील पदाधिकारी कार्यकर्ते कोणाच्या पारड्यात मत टाकणार, हे पाहावे लागेल. याशिवाय, मराठा आरक्षण आंदोलन, ओबीसी मोर्चाचा झालेला परिणाम या निवडणुकीत दिसून येईल.

**राणीताई लंके यांच्या सकारात्मक बाबी**
* निवडणूकीतील डावपेचात मुरब्बी
* खा.निलेश लंके यांच्या लोकप्रियतेचा फायदा
* निलेश लंके प्रतिष्ठानची प्रचंड प्रचार यंत्रणा

**नकारात्मक बाबी...**
* केवळ घराणेशाहीचे राजकारण म्हणून विरोधकांकडून होणारा अपप्रचार
* संभाषण कौशल्याचा अभाव

**काशिनाथ दाते यांच्या सकारात्मक बाबी**
* प्रभावशाली व्यक्तिमत्त्व व उत्कृष्ट वकृत्व शैली
* सभापती पदाच्या माध्यमातून मतदारसंघात केलेल्या विकास कामांचा फायदा
* महायुतीची प्रचंड प्रचार यंत्रणा
* उपमुख्यमंत्री अजित पवारांसाठीचीही प्रतिष्ठा पणाला...

**नकारात्मक बाबी...**
* सततच्या पक्षांतरामुळे नकारात्मक प्रतिमा
* उमेदवारी मिळविण्यासाठी उशिर झाल्याने मतदारसंघात कमी वेळ
* उद्धव ठाकरे व शरद पवार यांच्याबद्दल मतदारांमधील सहानुभूती

## २५ वर्षे सत्ता भोगणाऱ्यांना खंडाळा तालुक्याचा पाणी प्रश्न का सोडवता आला नाही? : पुरुषोत्तम जाधव

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**



**दि.१३, खंडाळा (सातारा) :** खंडाळा तालुक्याच्या पाणी प्रश्नाचा पुळका आलेल्या विद्यमान आमदारांना गेल्या २५ वर्षात पाणी प्रश्न का सोडवता आला नाही? खंडाळा तालुक्याचा फक्त मतापुरता वापर करणाऱ्या मूकनायक आमदारांना त्यांची जागा दाखवून द्या. वडील १० वर्षे खासदार हे १५ वर्षे आमदार अशी २५ वर्षे सत्ता घरात असूनही यांना वाई तालुक्यातील कवठे केंजळ योजना देखील पूर्ण करता आली नाही.वाई शहराला भेडसावणारा पार्किंग चा प्रश्न सोडवता आला नाही. ज्या किसनवीर आबांच्या नावाने राजकारण करतायत त्यांचे स्मारक अद्याप धूळखात पडलेय ते सुशोभित करता आले नाही आणि आता विधानसभा निवडणुकीत यांना खंडाळ्यात ट्रॉमा सेंटर उभे करण्याची आठवण झाली आहे.पाण्याची एक थेंबही तालुक्याबाहेर जाऊ देणार नाही याची आठवण झाली मग १५ वर्षे काय केले? असा थेट सवाल वाई खंडाळा महाबळेश्वर विधानसभेचे अपक्ष उमेदवार पुरुषोत्तम जाधव यांनी विद्यमान आमदारांना केला आहे.

पुरुषोत्तम जाधव यांच्या खंडाळा तालुक्यातील संपर्क दौऱ्याला मोठा प्रतिसाद मिळाला असून त्यांनी पारगाव, खंडाळा, बावडा, भादवडे, शिवाजीनगर, मोर्वे, अहिरे, सुखेड, बोरी, खेड, लोणंद, कोपर्डे, निपोडी, पाडळी, धावडवाडी, घाटदरे, हरळी या गावात जाऊन प्रत्यक्ष मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या व परिवर्तनात सहभागी होण्याचे आवाहन केले.

**शेतकरी भूसंपादन आंदोलन वेळी मूकनायक कुठे होते?**

निवडणुकीवेळी पोपटपंची करून मूकनायक आमदारांनी कधीही शेतकरी कष्टकऱ्यांचा विचार केला नाही.खंडाळा तालुक्यातील भूसंपादन शेतकऱ्यांच्यावर अन्याय होत होता त्यावेळी हे मूकनायक मूग गिळून गप्प बसले होते.असा टोला पुरुषोत्तम जाधव यांनी लगावला.


## वडगावशेरी मतदार संघात अपक्ष उमेदवार राजेश इंद्रेकर यांना मतदारांचा प्रतिसाद

**दि.१३, पुणे :** वडगावशेरी विधानसभेत उमेदवार निवडणूकीच्या रिंगनात उभे आहेत. सध्या वडगावशेरी विधानसभा मतदारसंघात प्रचाराच्या तोफा धडकू लागल्या आहेत. जो तो आम्ही कसे चांगले हे प्रचार समेत मांडताना दिसत आहेत. महायुतीच्या सरकारने महिलांसाठी लाडकी बहिण हि योजना सुरु करून १५०० रुपये दर महिना देऊन महिलांचे मतांमध्ये रूपांतर करण्याचा प्रयत्न केला आहे.

फाउंडेशन चालवणारा युवक अपक्ष आमदारकी कशी लढवू शकतो. सहकार्याने आणि दिलेल्या जबाबदारीने त्यांनी गेल्या चार ते पाच वर्षात आपल्या परिसरात सामान्य जनतेचे कामे केले. आरोग्य, शिक्षणाच्या, रोजगार समस्यां सोडवले. बसपा पक्षात अनेक वर्ष कार्यरत होते. त्यामुळे नेहमीच चर्चेत आहेत खरी पण आर्थिक बाजू कमकुवत असल्याने जनतेने अनेक ठिकाणी त्यांच्या झोळीत पैसे देऊन उमेदवारीसाठी शुभेच्छा देत विजयासाठी आशीर्वाद देत आहेत.

प्रचार दौरा सुरु असताना काही महिला समोर येऊन इंद्रेकर त्यांना भाऊ आमदार होऊनच या असा आशीर्वाद देत आहेत आपल्या भागात मिळणारा प्रतिसाद पाहता भारावून गेले. त्यामुळेच यंदाची निवडणूक हि धनशक्ती विरुद्ध जनशक्ती रंगत आहे.

## मुंबईचे तापमान वाढण्याची शक्यता



**दि.१३, मुंबई :** मागील दोन ते तीन दिवस मुंबई शहर, तसेच उपनगरांत उकाडा कमी झाला आहे. मुंबईतील किमान, तसेच कमाल तापमानातही अधूनमधून घट झाली होती. यामुळे पहाटे गारवा जाणवू लागला आहे. दरम्यान, पुढील दोन ते तीन दिवस मुंबईतील कमाल आणि किमान तापमानातही वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

पूर्वेकडील वाऱ्यांमुळे किमान आणि कमाल तापमानात वाढ होणार आहे. या कालावधीत कमाल तापमान पुन्हा ३५ –३६ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २४–२६ अंश सेल्सिअसपर्यंत राहील. तसेच वातावरणात आर्द्रता अधिक असल्याने दिवसभर उकाडा जाणवेल. यानंतर दोन दिवसांनी पुन्हा तापमानात घट होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. दरम्यान, मागील तीन – चार दिवस मुंबईतील किमान तापमानात घट झाल्यामुळे पहाटे गारवा जाणवू लागला आहे. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात बुधवारी ३३.८ अंश सेल्सिअस, तर सांताक्रूझ केंद्रात ३६.१ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. सांताक्रूझ केंद्रात मंगळवारच्या तुलनेत बुधावारी कमाल तापमान १ अंशाने अधिक नोंदले गेले. मुंबईत बुधवारी दुपारीही दिलासादायक वातावरण होते. दरम्यान, पुढील दोन दिवस कमाल तापमानात वाढ होणार असल्यामुळे, तसेच वातावरणातील आर्द्रतेमुळे उकाडा जाणवेल.

# संपादकीय



## क्रांतिकारकांचे गुरू

आज १४ नोव्हेंबर, स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांची जयंती. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे ( राऊत ) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रगाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली. भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करतना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यतिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही. वस्ताद लहुजी साळवे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# मुलांना आनंदी करणारा 'ऋतुराज' चाचा नेहरु !!


**- प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

दरवर्षी भारतामध्ये थोर स्वातंत्र्य सेनानी व भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल मोतीलाल नेहरू यांच्या १४ नोव्हेंबर या जन्मदिनी 'बालदिन' साजरा केला जातो, ज्यांना मुलांचे प्रेम होते. मुलांचे हक्क, शिक्षण आणि कल्याण याविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी भारतात बालदिन साजरा केला जातो. या दिवशी संपूर्ण भारतभर मुलांसाठी अनेक शैक्षणिक आणि प्रेरक कार्यक्रम आयोजित केले जातात. बालदिन हा एक खास बालकांसाठी विशेष दिवस म्हणून जगभर वेगवेगळ्या दिवशी साजरा केला जातो. २० नोव्हेंबर १९५९ रोजी संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या आमसभेने बालहक्कांची सनद स्वीकारली. २० नोव्हेंबर १९८९ रोजी बालकांच्या हक्क मसुद्यावर सदस्य देशांनी सह्या केल्या. या सनदेवर आतापर्यंत १९१ राष्ट्रांनी सह्या केल्या आहेत. संयुक्त राष्ट्रांचा बालकनिधी (युनिसेफ) ही संस्था जागतिक स्तरावर बालकांकडे लक्ष वेधून घेण्यासाठी विविध उपक्रमांचे नियोजन करून अंमलबजावणी करत असते. बालदिन जागतिक स्तरावर विविध देशांत वेगवेगळ्या दिवशी साजरा केला जातो.

जागतिक स्तरावर संयुक्त राष्ट्र संघटना जगातील मानवकल्याणासाठी विविध कृतिकार्यक्रम, विशेष दिन राबवून मानवामध्ये जाणीवजागृती करत असते. उदा. जागतिक महिला दिन, एड्स सप्ताह, मानवी हक्क दिन, बालदिन इत्यादी. यांमध्ये एक दिवसापासून ते एक आठवडा, पंधरवडा, पूर्ण वर्ष, दशक इतक्या कालावधीत नियोजित कार्यक्रम साजरे करून समाजपरिवर्तनाचा प्रयत्न केला जातो. या कालावधीत निश्चित कृतिकार्यक्रम करून जाणीव जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.

स्वातंत्र्य चळवळीच्या काळात तुरुंगवास भोगत असताना त्यांनी त्यांची एकुलती एक लाडकी कन्या भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना लिहिलेल्या पत्रांतून बालशिक्षणाबाबत आपले विचार मांडले आहेत. मुले काय शिकतात यापेक्षा त्यांच्यावर कोणते संस्कार होतात, हे पालक व शिक्षक यांनी पाहिले पाहिजे. त्यांनी मुलांना 'देवाघरची फुलेख मानली. ती बागेतल्या फुलांच्या कळीप्रमाणे असतात. त्यांना प्रेमाने व काळजीने हाताळली पाहिजेत; कारण बालकांमध्येच देशाचे भवितव्य दडलेले आहे; देशाची खरी शक्ती व समाजउभारणीचा पाया बालकेच असतात, असे ते म्हणत.

बाल दिनाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे, बालकांच्या गरजा व हक्क यांविषयी जाणीव-जागृती करणे, बालकल्याणकारी योजना वाढीस लावणे, बालकांमध्ये सांप्रदायिक व सांस्कृतिक देवाण-घेवाण करणे, बालकांमध्ये विविध पंथ वा धर्मांबाबत संहिष्णुता निर्माण करून सामंजस्याची भावना वाढीस लावणे, जगभरातील मुलामुलींमध्ये बंधुभाव



वाढीस लावणे, बालकांचे बालपण अधिक समृद्ध बनवणे, बालकांमध्ये 'विश्वकुटुंबाची' संकल्पना वाढीस लावणे ई. असे आहे.

बालदिनानिमित्त विभूतिपूजा टाळून, बालकांच्या गरजा व हक्क यांबाबत राष्ट्रातील पालकांमध्ये जाणीवजागृती निर्माण केली जाते. पंडित नेहरू यांचा धीरोदात्तपणा, वीरवृत्ती, असामान्य चरित्र व चारित्र्य, अथांग मानवता हे बालकांमध्ये संक्रमित करण्याचा प्रयत्न केला जातो. कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांनी म्हटल्याप्रमाणे 'जवाहरलाल म्हणजे ऋतुराज'. हा 'ऋतुराज' मुलामुलींमध्ये खुलवून त्यांचे जीवन आनंदी बनविण्याचा प्रयत्न केला जातो. मुलांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होण्यासाठी अशा दीपस्तंभाची गरज असते. ती भागविण्याचा येथे अल्पसा प्रयत्न सुरू आहे; परंतु आज शिक्षणपद्धतीकडे नेहरूंच्या दृष्टीने पाहिले जात नाही. त्यामुळे नको त्या वयात नको ते गुन्हे बालकांकडून घडत आहेत. त्यांची मने 'कोडगी' बनल्यामुळे भावनिक बुद्धिमत्ता कमी झाली आहे, याची पालकांना जाणीव राहिलेली नाही. बालगुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. याचे कारण आपण संस्काराला कमी पडत आहोत. इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे वाढते प्रमाण, प्रादेशिक भाषेतील शाळांमधील घटती विद्यार्थी संख्या; व्यापारी दृष्टिकोनातून शाळा काढून संस्थाचालक संस्थानिक बनले आहेत.

शिक्षक प्रशिक्षणाचा कणाच मोडला आहे. पूर्व माध्यमिक शिक्षणाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्यामुळे आज भ्रष्टाचार वाढला आहे. त्यासाठी चांगल्या चारित्र्याचे शिक्षक, पालक, संस्थाचालक, राज्यकर्ते इत्यादींची गरज आहे. त्यांची निर्मिती बालशिक्षणातून केली पाहिजे. केवळ 'बालआनंद मेळावा', 'बालमहोत्सव', 'बालदिन' या सारख्या दिवशी मनोरंजनात्मक कार्यक्रम साजरे न करता त्यांतून मुलामुलींमध्ये कुटुंब, समाज, देश इत्यादींबद्दल आपुलकीची भावना निर्माण झाली पाहिजे आणि त्यांप्रती उचित कार्य करण्याची प्रेरणात्मक शिकवण दिली पाहिजे.

**आज १४ नोव्हेंबर रोजी जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिनी सर्वांना 'बाल दिना'च्या हार्दिक शुभेच्छा...!**

# शंभुजती गुरू गोरक्षनाथ प्रकट दिन

गोरक्षनाथ ११ व्या ते १२ व्या शतका दरम्यान झालेले नाथ योगी होते.गोरक्षनाथांचे मंदीर गोरखपूर उत्तरप्रदेशामध्ये आहे. गोरक्षनाथांचे नावावरून नेपाळमधील गोरखा या नावाचा उगम आहे. गोरख जिल्ह्यात एका गुहेत गोरक्षनाथांचे एका पायाचे पद चिन्ह आहे.येथे वैशाख पौर्णिमा एक उत्सव होतो.

मच्छिंद्रनाथ भारतभर भ्रमण करीत असे फिरत असता एका घरी भिक्षा मागण्यास गेले.त्या स्त्रीस संतती नव्हती.दारी आलेल्या तेज:पूंज साधूला भिक्षा वाढताना पुत्रप्राप्तीची कामना व्यक्त केली.मच्छिंद्रनाथांने त्या स्त्रीला चिमूटभर भस्म दिले व आशिर्वाद दिला.मुलगा होईल सदर स्त्रीने आपल्या शेजारणीला झालेली हकीकत सांगितली पण त्या हसू लागल्याने त्या स्त्रीने ते भस्म शेणाच्या ढिगावर टाकून दिले. बारा वर्षांनी मच्छिंद्रनाथ परत आले व मुलाची चौकशी केली तेव्हा मूल झालेच नाही असे त्या स्त्रीने सांगितले. सर्व हकिकत स्त्रीकडून ऐकून मच्छिंद्रनाथ शेणाच्या ढिगाऱ्याजवळ जाऊन चलो गोरक्ष म्हणून हाक मारली.त्या शेणातून मुलगा प्राटला व म्हणाला 'आदेश' मग मच्छिंद्रनाथ त्याला घेऊन गेले. तेच गोरक्षनाथ.गोरक्षनाथांचा प्रभाव फक्त नेपाळ व भारतातच नाही तर अरब जगतावरही आहे.कानाला भोके पाडण्याची पद्धत गोरक्षनाथांनीच सुरू केली.अशी भोके पाडण्याआधी साधकांना अतिशय कठोर हटयोगाची साधना करावी लागे. ते साधू अवधूत असत.गोरक्षनाथांनी ९ नाथांना व ८४ सिद्धांना उपदेश केला.ते उपदेश केलेले ठिकाण म्हणजे अनुपम शीळा होय.ऋषींना घेऊन गुरु गोरक्षनाथ कौलगिरीकडे गेले तेथे त्यांना एका शिळेवर सर्व ऋषींना बसवून उपदेश दिला त्यातील ९ शिष्यांनी तो जसाचे तसा ग्रहण केला त्यांना नवनाथ म्हणतात. ते नवनाथ मच्छिंद्रनाथ,गोरक्षनाथ, गहिनीनाथ,जालिंदरनाथ,कानिफनाथ,भर्तरीनाथ,रेवणनाथ,नागनाथ व चरपटीनाथ.त्या शिळेला अनुपम शिळा म्हणतात.आदि गुरू दत्तात्रेय आणि गोरक्षनाथ यांचा संबंध पाहिला आहेच.भगवान दत्तात्रेय आणि सिद्धाचार्य गोरक्षनाथ यांची भेट गिरनार पर्वतावर झाली असल्याचे प्रसिध्द आहे.याच ठिकाणी गोरक्षनाथांवर दत्तात्रेयांनी सिद्धीसामर्थ्य दाखवून अनुग्रह केला.आज या स्थानाला कमंडलू तीर्थ' या नावाने महत्त्व प्राप्त झाले आहे.गोरक्षनाथांनी येथील शिखरावरील दत्तपादुकांचे दर्शन घेतल्याची कथा प्रसिद्ध आहे.दत्तांनी त्यांना या ठिकाणी उन्मत पिशाचवत् अशा दिगंबर, भस्मचर्चित, जटाजूटधारी अशा स्वरूपात दर्शन दिले.नाना सिद्धींचे चमत्कार दाखवून गोरक्षनाथांवर दत्तात्रेयांनी याच ठिकाणी कृपा केली.गोरक्षनाथांच्या परंपरेतील सर्व नाथांचा दत्तात्रेयांशी संबंध असल्याने व दत्तपंथातील अनेक महत्त्वाच्या बाबी नाथपंथाने विकसित केल्या असल्याने श्रीगोरक्षनाथांच्या चरित्राची रूपरेखा पाहणे अगत्याचे आहे.नाथसिद्धांच्या ज्या विविध नामावली सध्या उपलब्ध आहेत त्यांत गोरक्षनाथांचा उल्लेख येतो.मत्स्येंद्रनाथांचे शिष्य म्हणून गोरक्षनाथांचा उल्लेख येतो.

सर्व नाथभक्त गुरू गोरक्षनाथ यांचा प्रकट दिन मोठ्या उत्साहात साजरा करतात.

**- नाथभक्त केतन दत्ताराम भोज**
**- भ्रमणध्वनी - ८३६९५५४४१८**

## किंग मेकर..

अंगात उगाचं मस्ती
आहोत किंग मेकर
असो काडी पैलवान
समजती अंडरटेकर

बात करे पक्कान्नांची
नसूद्या शिळी भाकर
जेवण करतात दुसरे
आपण देणारं ढेकर

किंग होणारे विसरले
मिळते त्यांना ठोकर
विनोदा पुरते शोभले
गमत्याअसले जोकर

ऐट दावी मालकांची
पिढी जात जे नोकर
पडूनराहिलोपायाशी
विसरे आहोत चाकर

घेता का मंत्री मंडळा
सारखी मारी चक्कर
बेडकी फुगली जोरा
हत्तीशी घेतातटक्कर

आव्हान देई राजाला
विरोधात उभे लष्कर
अंति मी पडद्याआड
भविष्यकाळे ठिक्कर

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# 'बटेंगे तो कटेंगे' च्या नाऱ्याला महाराष्ट्रातील जनता भीक घालणार नाही : भगवानदास केंगार

**अक्षराज : प्रमोद चिनके**

**दि.१३, सांगली :** भाजपला देशात आणि महाराष्ट्रात जाती-पातीत धर्मामध्ये तेढ निर्माण करून भाजपला काय साध्य करायचे आहे.?. भाजपच हे हिंदुत्व ढोंगी व निवडणुकीवर डोळा ठेवून केलेले घोषणा आहे.उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यानी बटेंगे तो कटेंगे.. चुनाव होने के बाद देश को और महाराष्ट्र को लुटेंगे हा भाजपचा कुटील डाव आहे हे देशातील व महाराष्ट्रातील जनतेने आता ओळखलेली आहे. मोदी म्हणतात एक रहोगे तो नेक रहोगे.. हिंदुस्तान ७५ वर्षापासून एक आहे आणि नेक आहे आणि राहील ही निवडणुकीच्या तोंडावर मोदींना चिंता करण्याची गरजच काय पडली..?

देवेंद्र फडणवीस म्हणतात वोट जिहादपासून सावध रहा.. पण निवडणुकीमध्ये मदरशा दर्ग्यामध्ये मतासाठी का लोटांगण घालता..? याच्यावर देवेंद्र फडणवीस का बोलत नाहीत..

निवडणूक आली की हिंदू मुस्लिम धर्मवाद-प्रांतवाद भाजपला आठवतो निवडणूक झाली की महाराष्ट्र व देश लुटायला भाजप मोकळीच आहे.सोबतीला आहेत अदानी आणि अंबानी या दोन चाकावर भाजपचा गाडा चालतोय.. महाराष्ट्रातील उद्योग धंदे मोदी-शहा च्या कृपेने गुजरात-युपी-बिहार ला पाठवतात त्या बद्दल फडणवीस का बोलत नाहीत. देशातील हिंदू-मुस्लिम सर्व बहुजन समाज आता जागं आहेत त्या मुळे भाजपच्या या फसव्या घोषणेला आता देश फसणार नाही.देश जागृत झाला म्हणूनच लोकसभेला अयोध्येमध्ये ५ ही जागेवर भाजपला सफाटुन मार खावा लागला.कटेंगें तो बटेंगे हा आमचा नारा नाही..बचेंगे तो और भी लढेंगे हा छत्रपतींच्या मावळ्यांचा नारा आहे हे बहुजनांनी विसरून चालणार नाही. महाराष्ट्रातील जनता गुण्यागोविंदाने एकोप्याने राहतात हे महाराष्ट्रातील एकजूट अखंडता अशीच राहावी. आणि भाजपच्या या फसव्या घोषणेला मुठ माती द्यायची वेळ आली आहे.

म्हणून बहुजनांनी एकत्र राहून महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे. राहुलजी गांधी. शरद पवार साहेब यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेल्या महाविकास आघाडी सोबत राहून महाविकास आघाडीला सत्तेत बसवु या असे आवाहन शिवसेना नेते तथा सरपंच सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष भगवानदास केंगार यांनी आवाहन केले आहे.

# बालदिन!

आज १४ नोव्हेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात बालदिन म्हणून साजरा केला जातो. वास्तविक जागतिक पातळीवर २० नोव्हेंबरला बालदिन साजरा केला जातो. १९५४ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने ठरवल्यानुसार, पाहिल्यांदाच बालदिन साजरा करण्यात आला. सर्व देशांनी लहान मुलामुलींमध्ये सांप्रदायिक आदान-प्रदान व विविध संप्रदाय वा धम बाबतचे सामंजस्य वाढवणे तसेच जगभरातील मुलामुलींचे आयुष्य अधिक चांगले बनवण्याची संकल्पना मान्य करून त्यादृष्टीने काम करावे हा त्या मागचा हेतू. २० नोव्हेंबर हीच तारीख निवडण्याचे कारण असे की १९५९ मध्ये याच तारखेस संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने बाल हक्कांची सनद स्वीकारली. शिवाय १९८९ मध्ये याच दिवशी बाल हक्कांच्या मसुद्यावर सह्या झाल्या. हे हक्क आतापर्यंत १९१ देशांनी मान्य केले. भारतात मात्र १४ नोव्हेंबर रोजी बालदिन साजरा केला जातो. कारण भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचा हा जन्मदिवस. १४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म झाला. पंडित नेहरूंना लहान मुले खूप आवडायची. ते सतत लहान मुलांच्या गराड्यात असायचे. लहानमुले हेच देशाचे भविष्य आहे. आजचा बालक उद्याचा नागरिक आहे. तो नेहमी आनंदी, उत्साही आणि सुरक्षित असायला हवा. देशातील लहान मुले सुरक्षित तर देश सुरक्षित असे ते नेहमी म्हणत. मुलामुलींना सुरक्षित आणि प्रेमाच्या वातावरणात वाढवले गेले पाहिजे तसेच त्यांना आपले आयुष्य फुलवण्याच्या आणि पर्यायाने देशाच्या विकासात भर घालण्याच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते. पंडित नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान होते. पंडित नेहरूंना बालकांविषयी वाटणाऱ्या प्रेमाची आठवण म्हणून हा दिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो शिवाय पंडित जवाहरलाल नेहरूंना मुलांविषयी वाटणाऱ्या प्रेम व जिव्हाळ्याविषयी आदर व्यक्त करण्याचा देखील हा एक मार्ग आहे. बालकांनाही आनंद घेण्याचा, मौजमस्ती करण्याचा हक्क आहे. आजचे बालक हाच देशाचे भविष्य आहे. या बालकांमधूनच देशाचे भावी सुशिक्षित तसेच मनाने आणि शरीराने आरोग्यसंपन्न असे नागरिक तयार होणार आहेत. हा हक्क मिळालेल्या नशीबवान बालकांनी आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेण्याची जाणीव ठेवली पाहिजे. पालकांनी ही जाणीव आपल्या मुलांमध्ये रुजवली तर भावी नागरिक सुज्ञ आणि समजूतदार बनतील त्यामुळे देशाचे भविष्य उज्ज्वल होईल. बालदिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने मुलांच्या कल्याणासाठी काहीतरी करण्याचा संकल्प केला पाहिजे. देशातील सर्व मुलामुलींना बालदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# पायी दिंड्यांची निघाली वारी; उमेदवार मतदारांच्या दारी...

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१३, कल्याण (ठाणे) :** मतदानाच्या दरम्यानच कल्याण, ठाणे, डोंबिवली, मुंब्रा, कळवा,देसाईगांव, नांगाव सह महाराष्ट्रातील गावागावातून विविध धार्मिक स्थळांकडे निघणाऱ्या भाविक वारकऱ्यांच्या पायी दिंड्यामुळे सर्वच राजकीय पक्षांच्या उमेदवारांची समीकरण बिघडण्याची शक्यता आहे. अशा या दिंडीत जाणाऱ्या हजारो वारकऱ्यांच्या मतदानासाठी वेळेत परत आपल्या गावात आणण्यासाठी विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारांचे टेन्शन वाढले आहे.

राज्यात मतदान २० नोव्हेंबरला २०२४ ला आहे. त्यासाठीच्या प्रचारादरम्यानच प्रबोधिनी एकादशी, श्री ज्ञानेश्वर महाराज समाधी सोहळा उत्सव, पंढरपूर यात्रा, संत नामदेव महाराज जयंती, कार्तिकी पौर्णिमा, त्रिपुरारी पौर्णिमा यादी विविध धार्मिक विधी सोहळ्याच्या निमित्ताने दरवर्षी महाराष्ट्रातील विविध धार्मिक स्थळाकडे हजारो भाविक, वारकरी पायी दिंडीतून रवाना झाले आहेत. तुळशी विवाहाच्या दिवसापासून वारकऱ्यांच्या दिंड्यांना पारंभ होतो. धार्मिक स्थळाकडे निघणाऱ्या शेकडो पायी दिंडिया मध्ये हजारो वारकरी सहभागी होतात.

राज्याच्या ठिकाणातून निघणाऱ्या पायी दिंडी पालखी उत्साहत हजारोच्या संख्येने वारकरी सहभागी होत असतात. हजारोच्या संख्येने असलेले वारकरी कोणत्यातरी मतदारसंघातील मतदार असतात मतदानाच्या दरम्यान पायी निघणाऱ्या दिंडी पालख्यांमुळे विविध राजकीय पक्षाच्या मताची समीकरणे बिघडण्याची शक्यता आहे.

त्यामुळे सर्व राजकीय पक्षांच्या उमेदवारांची धावपळ सुरू झाले आहे. अनेक राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी वारकऱ्यांच्या भेटीसाठी घेऊन मतदार संघात मतदानासाठी माघारी येणाऱ्या जाणाऱ्या साठी मनधरणी मिनतवाऱ्या सुरू केले आहेत.

# शेकडो समर्थकांसह काँग्रेस महिला आघाडीचा अभिजीत पाटलांना पाठिंबा

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१३, पंढरपूर :** माढा विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने अधिकृत उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात असलेले विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांना सर्वच स्तरातून विविध राजकीय संघटनासह सामाजिक कार्यकर्त्यांचा प्रचंड पाठिंबा वाढत असून आज काँग्रेसच्या सोलापूर जिल्हा महिला आघाडीच्या उपाध्यक्ष अश्विनी भापकर यांनी शेकडो महिलांसह अभिजीत पाटील यांच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवून आपला पाठिंबा जाहीर केला आहे.



तालुक्यातील तुंगत या ठिकाणी अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ काढलेल्या भव्य महिला फेरीमध्ये भापकर यांनी आपल्या समर्थकांसह उपस्थिती दर्शवली त्यांनी जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या माध्यमातून जिल्ह्यात मोठे सामाजिक उपक्रम राबविले असून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अभिजीत पाटील हे आहेत तसेच त्यांनी आतापर्यंत साखर कारखान्यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात शेतकरी हिताचे निर्णय घेतले आहेत. तसेच सोलापूर जिल्ह्यात ऊस दरामध्ये स्पर्धा सुरू करण्यात मोलाचे योगदान अभिजीत पाटील यांचे असल्याने सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेणारा माणूस म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे. ही निवडणूक एकतर्फी झाली असून प्रस्थापितांच्या विरोधात सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असल्याने त्यांना ग्रामीण भागातून मोठा प्रतिसाद लाभत आहे सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षा अश्विनी भापकर यांनी आपल्या महिला कार्यकर्त्यांसह अभिजीत पाटील यांची भेट घेतली आणि आपला पाठिंबा त्यांना असल्याचे जाहीर केले. यामुळे अभिजीत पाटील यांचेसाठी मोठे पाठबळ असुन महिला समर्थकांनी पाटील यांचे विजयासाठी संपुर्ण माढा मतदारसंघात आपली प्रचारयंत्रणा कामाला लावली आहे. यावेळी

तुंगत गावच्या लोकनियुक्त महिला सरपंच अमृता रणदिवे, संगीता रणदिवे, राणी पाटील, भाग्यश्री पाटील, माधुरी पाटील, प्राजक्ता पाटील, मंगल कदम रुपाली साळुंखे, वैशाली लामकाने, गीतांजली साळुंखे, ज्योती बनसोडे, यांचेसह महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

# वाई मतदारसंघांत आबांशिवाय पर्याय नाहीच...

**मकरंद लक्ष्मणराव पाटील उर्फ आबा यांचा बोपेगावच्या सरपंचपदापासुन आमदारकीपर्यंतचा थक्क करणारा राजकीय-सामाजिक प्रवास..!!**

घराणेशाहीमधुन पुढे आलेले अनेक नेते आपणांस रोज आवतीभवती दिसत असतात मात्र आबा हे थोडे वेगळेचं व्यक्तीमत्व आहेत आधी सरपंच नंतर जिल्हा परिषद सदस्य व शेवटास आमदार असा एकंदरीत प्रवास करताना आबांना अनेक खडतर गोष्टीस सामोरे जाण्यांस लागले २० वर्षापुर्वी आबांना राष्ट्रवादी पक्षाअंतर्गत अधिकृत उमेदवारी भेटली होती मात्र त्यावेळेस वाई-खंडाळा मतदारसंघातील काही लोकांना आबा हे खासदार सपुत्र आहेत हे रुचले नाही त्यामुळेच आबाचा दारुण पराभव झाला.या पराभवामुळे आबा नावाचे राजकीय वादळ हे खचुन गेले नाहीत तर दुसऱ्या दिवशी पासुन पुन्हा नव्या जोमाने आपली चातुऱ्या बुध्दी, अफाट कार्यक्षमता घेऊन पुन्हा कामास लागून समाजातील तळागाळापर्यंत कार्यअंतर्गत पोहचले आणी समाजातील या कामांचा आबाना प्रत्याक्षात फायदा २००९ सालच्या विधानसभा निवडणुकेतील यशाच्या रुपात प्राप्त झाला आणी मकरंदआबा नावाचा साक्षात देवमाणूस शेवटी आमदार झाला...

वाई तालुका म्हटलं की सुशिक्षित-हुशार-बागायीत जनमाणसांचा तालुका त्यावेळेस प्रत्येक पाच वर्षानंतर नेतृत्व बदल करणारा तालुका चांगलं वाईट लगेच समजणाऱ्या जनमाणसाचा तालुका पण आबाची डोंगरा ऐवढी प्रचंड मोठी कार्यक्षमता व लोकांना आपलेसे करण्यांची प्रवृत्ती यामुळेच आबा वाई-खंडाळा-महाबळेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आज तीनदा यशस्वी आमदार आहेत तसेच आपल्याशा प्रवृत्तीमुळे मतदारसंघात आबांचे विरोधक कमी व समर्थक जास्त आहेत.हा मतदारसंघामधील बदल एकारात्रीत झाला नाही.मतदारसंघामधील लोकांना आपलेसं करण्यांसाठी आबांना गेल्या वीस वर्षातील राजकीय प्रवासात प्रचंड मेहनत घ्यावी लागली हीच मेहनत आपणास यशाच्या रुपात प्रत्यक्षात वेळोवेळी दिसत आहे...??

'वाई-खंडाळा-महाबळेश्वर' हा मतदारसंघ क्षेत्रफळांच्या दृष्टीने महाराष्ट्रांतील सगळ्यांत मोठा मतदारसंघ आहे.या मतदारसंघाच्या एका टोकांपासुन दुसऱ्या टोकांपर्यंतचा प्रवास गाडीने जरी करयांचा म्हटलं तरी चार तास ही कमी पडतात पण आबांने आपल्या संपर्की कौशल्यांचा जिवांवर मतदारसंघातील एक गाव ही विकासगंगा पासुन वंचित ठेवले नाही तसेच मतदारसंघात ३५० गावे असताना प्रत्येक गावांतील आपल्या प्रत्येक कार्यकर्त्यांना आबा नावांसह ओळखतात हीच एक विशेषबाब...आबांनी फक्त विकासगंगाच प्रत्येक गावात पोहचवली नाहीतर मतदारसंघातील बहुधा गरीब-वंचित-शोषित असु किंवा श्रीमंत व्यक्ती प्रत्येकांचा सुखा-दुखात आबा हे जातीने हजरी लावत असतात अधिवेनशाच्या कालखंडात आपणास जाण्यास वेळ मिळत नसेल तर आबा आपले जेष्ठ बंधू मिलिंदकाका पाटील किंवा लहान




बंधु खासदार नितीनकाका यांना जाण्यास भाग पडतात आज आबांच्या मतदारसंघाची तुलना जर जिल्ह्यातील इतर मतदारसंघाशी केली तर आबा प्रत्येक ठिकाणी प्रत्येक बाबतीत अगदीच सरस दिसतात सरस ठरतात मतदारसंघातील कोणत्याही गावांत आबांनी विकासाअंतर्गत रस्त्यांपासुन-स्मशनभुमी-आरोग्य योजना-जलसिंचन योजना-नळपाणी योजना, समाजमंदीरपर्यत अनेक विकासकामे जनतेपर्यत पोहचवली आहे किंबहुना हे कार्य आबा भविष्यांत ही असेच चालू ठेवतील यात तिळमात्र शंका नसावी. तालुक्यातील-विभागातील किसनवीर कारखाना नावाची मोठी साखर संस्था कर्जाची खाईत जाऊन आज पूर्णपणे बंद पडण्याच्या मार्गांवर होती ही संस्था बंद पडल्यास 'तालुक्यातील-जिल्हातील' अनेक ऊसउत्पादक शेतकरी देशोधडीस लागला असतात या पीडित शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन ही संस्था पुन्हा नव्याने पुर्नजिवंती करण्यासाठी आबांनी आपली आमदारकी पणास लावून निवडणूक लढवली व मोठया फरकांने निवडून आणली मात्र खरी परीक्षा होती तेही बंद पडलेला कारखाना चालू करण्याची.. कर्जाचा अफाट डोंगर असलेल्या या संस्थेस नव्याने कोणतीही बँक कर्ज देत नव्हती म्हणून शेतकऱ्यांकडून भागभांडवल स्वरुपात आर्थिक साधन गोळा करण्याचा निर्णय आबा व त्याचे बंधू नितीनकाका यांनी घेतला खरा पण किसनवीर कारखान्याचे बाजारात ढासळलेली पत पाहता शेतकऱ्यांना विश्वास संपादन करुन भागभांडवल गोळा करणे फार जिगरीचे जाणार होते मात्र आबांवरील मतदारसंघातील नागरिकांचे 'प्रेम-विश्वास' पाहता हे शक्य होण्यास वेळ लागला नाही यासाठी आबांचीही भरपूर पायपीट झाली 'वाई-खंडाळा' तालुक्यातील प्रत्येक गावात सभा भरावून कारखान्यास आपण कर्जाच्या खाईत काढून पुन्हा कारखान्यास कसे..??... गतवैभव प्राप्त करुन देणार आहोत याचा आलेख मांडावा लागला त्यानंतरही माजी अध्यक्षांनी किसनवीर कारखान्यास गाळप परवानगी मिळू नये म्हणून हेतपूर्वक खोडा घातला यासाठी वारंवार उपमुख्यमंत्री फडणवीस दरबारी हजेरी लावली त्यावर ही आबांनी मात करत मुख्यमंत्री शिंदेसाहेबांना विनंती करुन गाळप परवानगी आणली तसेच नवीन संचालकमंडळाची व आपली वैयक्तिक खाजगी मालमत्ता तारणयुक्त पद्धतीने संकटात टाकत कारखान्यास नवीन ४६८ कोटी थकहमी कर्ज मिळवण्यास आबा यशस्वी झाले आबासाहेबांचे हे सर्व कारखान्याबाबतीत धोरण व कार्य पाहता कारखान्यासही येत्या ५ वर्षांत पुन्हा एकदा नव्याने जुने गतवैभव मिळल्यास नवल नसावे. आबा कोणत्याही राजकीय मंचावर कधीच विरोधकांवर गल्लीच्छ भाषेत टीका करत नाही तसेच आबा राजकीय मंचाचा वापर आपण केलेली विकास कामे व भविष्यात करु पाहणारी विकासकार्याचा लेखाजोखा मांडण्यासाठी करत असतात अस मंचावरील कार्य फक्त देशातील भूतपूर्व राजकीय नेतेमंडळीच करत असत तिचं राजकीय परंपरा आबा समर्थपणे आपल्या दैनंदिन जीवनात चालवत आहेत.२० वर्षांत आबांना मतदान न करणारी अनेक राजकीय वैर असलेली जाणती मंडळी आबांकडे काही कामानिमित्त गेल्यास आबा आपल्या मनात कोणत्याही राग-द्वेष मनात ठेवता त्यांचेही काम प्रामाणिकपणे करण्याचे प्रयत्न करतात म्हणूनच आबा अनेकांना सार्थापणे भावता.

एखाद्या बड्या व्यक्तीचा लग्नकार्यांत जेवढी जनमाणसे गोळा होत नसतील त्यापेक्षाही कैकपटीने मतदारबंधू आपले प्रश्न किंवा कैफियत मांडण्यासाठी रोज सातारा येथे आबांच्या बंगल्यावर जमा होत असतात आबा ही त्यांना नाराज करतही नाहीत लोकांचे प्रश्न-समस्या जाणुन घेऊन ते समस्या प्रामणिकपणे सोडवण्याचा प्रयत्न करत असतात एक वेळ आबा आपल्या घरातील सदस्यांना वेळ देणार नाही पण मतदारसंघामधील लोकांचे शंकेचे निराकारण केल्याशिवाय राहणार नाही त्याचप्रमाणे मतदारसंघातील कोणत्याही सर्वसाधारण व्यक्तीने आबास फोन केलेसं आबांने तो फोन कधी उचला नाही असे झालेच नसावे म्हणुनच जनसामान्यांचा हा नेता मतदारसंघामधील प्रत्येक व्यक्तीस आपलासा वाटतो व भविष्यात ही वाटणारच प्रथम आमदार झाल्यास पाय जमिनीवर होते किंबहुना भविष्यात मंत्री झाल्यावरही जमिनीवरच असतील मकरंद पाटील नावाच्या भल्या माणसाच्या मनात न कोणाबद्दल द्वेष न सत्तेचा गर्वीष्ठपणा म्हणूनच 'आबा' हे लोकांचे लाडके नेतृत्व आहेत व सदैव राहतील लोकहितांसाठी काम करणाऱ्या आबांना अनेक कार्य करत असताना कितेक अडथळे येतात पण आबा हे त्याच्या वर मात करुन पुढे जातात हीच आबाची खरी ओळख.

**शेवटी काय 'वाई-खंडाळा-महाबळेश्वर' या मतदारसंघाचा जननायक येणाऱ्या २०२४ च्या निवडणुकेनंतर आपणांस मंत्री म्हणुन विधानसभेत दिसल्यांशिवाय राहणार नाही याचा आपणास पुर्ण विश्वास आहे त्याचबरोबर आबांचे विकासगंगेचे कार्य व लोकसेवा अशीचं चालु राहील अशी आशा करुन आबांना भावी वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा..!!**

**आबांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा...**

**बाळकृष्ण गणपत सोनवणे.**

**ॲड. / नोटरी(भारत सरकार)**

**सौ.मनिषा बाळकृष्ण सोनवणे.**

**सरपंच मिरजे,मिरजेवाडी.**

# थोडक्यात

## खेड खाडी पट्टा विभागात मनसेचा दमदार प्रचार



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१३, खेड (खाडीपट्टा) :** खेड तालुक्यातील सुसेरी जिल्हा परिषद गट खाडी पट्टा विभागात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे २६४ गुहागर विधानसभा उमेदवार प्रमोद गांधी यांच्या प्रचाराने वेग घेतला असून बहिरवली मोहल्ला नं.१ व २आणि ३ मध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कार्यकर्ते, पदाधिकारी जोमाने प्रचाराला लागले आहेत. खेड तालुक्यातील खाडी पट्टा विभाग संपर्क प्रमुख मंगेश जाधव, महाराष्ट्र नवनिर्माण सेना विद्यार्थी सेना अध्यक्ष औवेश चौगुले, युवराज कदम, घनश्याम शिगवण, बहिरवली गावचे शाखा अध्यक्ष संकेत आडवीलकर, विनोद हलदे आदी मनसेचे कार्यकर्ते, पदाधिकारी यांची प्रचारात महत्वपूर्ण उपस्थिती होती.

## मनसेचे प्रमोद गांधी यांनाच विजयी करण्याचा निर्धार



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१३, चिपळूण :** चिपळूण तालुक्यातील कळंबट,ओंबळी, नारदखेरकी,तुरंबव विभागात गुहागर विधानसभा मनसेचे अधिकृत उमेदवार प्रमोद गांधी यांना ग्रामस्थांनाचा जोरदार प्रतिसाद मिळत असून, प्रमोद गांधी यांनाच विजयी करण्याचा या ठिकाणी ग्रामस्थांनी निर्धार केला आहे. प्रसंगी प्रमोद गांधी जनतेशी संवाद साधताना.

## कोपरी-पाचपाखाडीत एकनाथ शिंदे यांना बौद्ध समाजाचा बिनशर्त पाठिंबा



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१३, डोंबिवली (ठाणे) :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोपरी-पाचपाखाडी मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ठाणे पूर्व विभागातील बौद्ध समाजाने बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. आंबेडकरी चळवळीतील युवानेते राजेश गाडे यांच्या नेतृत्वाखाली हा पाठिंबा देण्यात आला, ज्यामुळे शिंदे यांना प्रचंड बहुमताने निवडून आणण्याचा संकल्प करण्यात आला आहे. शिवसेनेचे उमेदवार असलेल्या शिंदे यांनी कोपरी-पाचपाखाडी मतदारसंघातून सलग तीन वेळा प्रतिनिधित्व केले असून यंदाही मोठ्या मताधिक्याने विजयी होण्यासाठी शिवसेना पदाधिकारी मेहनत घेत आहेत. बौद्ध समाजाच्या पाठिंब्यामुळे शिंदे यांची स्थिती आणखी भक्कम झाली आहे. या कार्यक्रमात बोलताना राजेश गाडे यांनी शिंदे यांच्या समाजासाठी केलेल्या कार्यांचा उल्लेख केला व समाजाने शिंदे यांच्यासोबत उभे राहण्याचे आवाहन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष नितीन पाटील, सामाजिक कार्यकर्ते हेमंत पमनानी, शाखाप्रमुख रोहित गायकवाड, बौद्ध उपासक शांताराम गमरे, शाहीर सुखदेव कर्डक, नागनिका महिला मंडळाच्या अध्यक्षा कमल तेलुरे तसेच समाज बांधव व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अर्धा डांबरी अर्धा धुरळा... पुन्हा पाच वर्षे थांबा !




**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१३, गुहागर :** विधानसभा निवडणूक २०२४ प्रति २६४ गुहागर विधानसभा मतदारसंघात निवडणुकांच्या प्रचारानी वेग घेतला असून सर्वच राजकीय पक्ष निवडणुकांचा प्रचाराचा धुरळा उडवत आहेत, निवडणुका येतात जातात मात्र रस्त्यांचा झालेला हा धुरळा कायमच राहतो.प्रचारा दरम्यान महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्याने थेट अर्धा डांबरी अर्धा धुरळा उडालेल्या रस्त्यावरच बसून गुहागर मतदारसंघात रस्त्यांची झालेली दूरवस्थेकडे जनतेचे लक्ष वेधले आहे.

# पारनेर-नगर मतदार संघात खरी लढत तिरंगीच !

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१३, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर नगर विधानसभा मतदार संघात अनेक उमेदवार उभे असले तरी खरी लढत ही तिरंगीच होणार आसल्याचं चित्र आज पहावयास मिळते.

आज पारनेर तालुक्याचा विचार केला तर,विकासाच्या मुद्यावर कोणताच उमेदवार बोलताना दिसत नाही.जाती पातीचे राजकारण न करता सर्वासाठी योजना राबवणारे सरकार आज जनतेला हवं आहे.प्रत्येक उमेदवारांचे एकमेकांवर अरोप प्रत्यारोप करुन जनतेची फसवनुक करतांना दिसतात. पण आजचा मतदार कोणत्याही भुलथापांना बळी न पडता हुशार झालेला आहे. प्रत्येकाची जागा ही मतपेटीतुन दाखवल्याशिवाय राहणार नाही.



आजचा मतदार हा पक्ष, संघटना, पुढारी, नेता सरपंच, चेअरमन यांच्या मागे नसुन विकासाच्या मुद्यावर, शेतकरी हिताच्या योजना, जीवनावश्यक बाबाकडे लक्ष केंद्रीत करुन उमेदवार कसा आहे तो जनतेच्या सुख, दुखात भाग घेणारा आहे का? त्याने आज पर्यत केलेल्या कामाचा आढावा घेऊनच मतदान करणार आहे.

पारनेर नगर विधान सभेच्या निवडनुकीला उभ्या असलेल्या सौ. राणीताई लंके यांनी ही जिल्हा परीषद पाहीली आहे त्यांनी त्यांच्या कारकिर्दित अनेक विकास कामे केलेली आहेत. त्यांनी केलेल्या कामांचा आढावा घेऊन, लोकनेते आणी आजचे खासदार निलेशजी लंके यांनी केलेल्या कामांची पावती जमेला धरुन आजचा मतदार मतदान करणार आहे.

गेल्या सरकारने केलेल्या कामाचा पुरेपुर फायदा महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांना ही होणार आहे. विशेष म्हणजे लाडकी बहीण, ही योजना गेल्या सरकारने आखली आणी काही दिवसातच लगेच तातडीने आमलात आनली त्यामुळे स्रियांच्या ह्या लाडकी बहीण योजनेमुळे ३५% मतदान हे महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांनाच पडणार ! यात शंकाच नाही,

आणी पारनेर नगर मतदार संघातील नगर तालुक्यातील ४५ गावांचा समावेश असुन त्या भागातुन एकमेव उमेदवार म्हटलं की संदेशजी कार्ले यानी ही रणशिंग फुकलेले आहे. नगर तालुक्यातुन कित्येक ग्रामपंचायतीने ठरावाने पुकारले आहे. एकमेव संदेशजी कार्ले यांनाच मतदान करायचे अहवान केले आहे.

त्यामुळे पारनेर नगर विधान सभेची निवडनुक ही तिरंगीच होणार आसल्याचं चित्र आज पहावयास मिळते. असे माहीती सेवा समिती, आरपीएस स्टार न्युजचे उपाध्यक्ष राजकुमार इकडे यांनी सांगितले.

# तालुक्यातील हुकूमशाही संपवा विक्रमसिंह पाटणकर

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१३, पाटण :** गेल्या ३० वर्षात हा तालुका उत्कृष्ट म्हणून ओळखला जात होता. राजकारण बिघडवणार्यांनी ना रोजगार निर्मिती केली ना शेतीपूरक व्यवसाय उभारले. दमदाटी आणि हुकूमशाही प्रवृत्ती वाढली आहे. कार्यकर्ते चे महत्त्व कमी झाले, त्यांना किंमत राहिली नाही, सतत अपमानित करणे याच गोष्टी होत राहिल्या. आता निर्भय झाले पाहिजे. कोणाची गुलामगिरी करु नका तर आपल्या विचाराने मतदान करा अस मत मा. मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांनी व्यक्त केले.

मालदन याठिकाणी आयोजित संवाद मेळावा विक्रमसिंह पाटणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. मा. मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांनी बोलताना, ढेबेवाडी भाग सुशिक्षित लोकांचा भाग आहे. राजकारण बिघडले, पातळी घसरली आहे अस म्हणतो परंतु, राजकारण बिघडवणारे कोण आहे? पैशाच्या जोरावर माणसं खरेदी केली जात आहेत. हीच पद्धत पडली तर ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद स्तरावरती अश्याच अमिषांच्या निवडणूका लढवल्या जातील. चांगली माणसं निवडून द्यायची की धंदेवाईक ठेकेदारांना



निवडून द्यायचे हे ठरवा. सगळेच ठेकेदार वाईट नाही परंतु सध्य स्थिती पाहिलं तर वाममार्गाचा अवलंब करणारे लोक आजूबाजूला आहेत.

हा गाव भाग सुशिक्षित, सुसंस्कृत लोकांचा आहे. आजचे गलिच्छ राजकारण दिसत आहे ते मागील चूकिचे प्रायश्चित दिसत आहे. ही लोक पुन्हा निवडुन येणार नाही याची काळजी लोकांनी घेतली पाहिजे. समाजात, लोकांमध्ये भांडणे लावणे हे तंत्र या लोकांनी अवलंबले आहे.

या अगोदर बिनविरोध निवडणूक होत होत्या. आता गावा, लोकांत, वॉर्डात भांडणे लावली जात आहेत. या निवडणुकीत पक्ष गट न पाहता चांगला माणूस, गट निवडून द्या. तरचं भविष्यात चांगले राजकारण पाहायला मिळेल. आपल्याला नविन पिढी घडवायची आहे. आम्ही जुन्या पिढितील लोक आहोत तुम्ही ठरवा चांगले ऐकायचे कि वाईटाचा संग करायचा. भविष्यात युवा पिढिचे भविष्य घडवायचे आहे. मोठ्या प्रमाणात घरदार सोडून लोक शहरात जात आहेत. हे थांबवाचे असेल तर लोकांनी निर्भय बनले पाहिजे. गावातील भांडणे गावात मिटवून गटबाजीचे राजकारण न करता सर्वसामान्य लोकांना चांगले जिवन कसे जगता येईल हे पाहिले पाहिजे. विशेषतः सुशिक्षित लोकांची जबाबदारी आहे.

ढेबेवाडी विभागात पाहिले तर महिंद धरणाची बांधणी झाली परंतु त्यातील गाळ काढणे सध्याच्या लोकप्रतिनिधी नां जमले नाही. दोन जेसीबी चार ट्रँक्टर उभे करुन एका दिवसात फोटो सेशन केले परंतु प्रत्यक्ष गाळ धरणात राहिला. आमच्या काळात ठिकठिकाणी एटीबंधारे उभारले, शेतीच्या योजना केल्या. परंतु या योजनांना पाणीपुरवठा सध्या अपुरा पडत आहे.

कोट्यावधी विकासाच्या गप्पा मारणार्यांचा विकास होतो कधी आणि पावसात वाहून कसा जातो हे जनता बघत आहे. झालेली काम लोक उपयोगी किती आहेत हे लोकांना माहिती आहे. टक्केवारी मध्ये विकास गायब झाला आहे अस सांगितले.

# सोसायटी, हॉटेल्स व मार्केट असोसिएशन आणि एमआयडीसी उद्योग समुहांचा मतदार जनजागृती मोहिमेत सहभाग

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१३, नवी मुंबई :** निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव असून प्रत्येकाने संविधानाने आपल्याला दिलेला मतदानाचा अधिकार बजावावा आणि २० नोव्हेंबर रोजी कर्तव्य भावनेने मतदान करावे असे सूचित करीत नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी करीत जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत मतदान करण्याचा संदेश पोहचवावा असे आवाहन केले.

मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात विविध सोसायट्या, नवी मुंबई हॉटेल्स असोसिएशन, मार्केट असोसिएशन, ठाणे बेलापूर इंडस्ट्रिज असोसिएशन यांचे पदाधिकारी यांची मतदार जनजागृती बैठक महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.



याप्रसंगी नवी मुंबईतील दोन्ही विधानसभा मतदार संघाचे स्वीप नोडल अधिकारी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे व संतोष वारुळे, सहा.संचालक नगररचना सोमनाथ केकाण, १५० ऐरोली विधानसभा स्वीप नोडल अधिकारी उपआयुक्त अभिलाषा म्हात्रे पाटील, १५१ बेलापूर विधानसभा स्वीप नोडल अधिकारी सहा. आयुक्त सागर मोरे उपस्थित होते.

नेमके कोणत्या खोलीमध्ये मतदान आहे याची फलक लावून माहिती प्रसिध्द केली जाणार आहे. रांगेच्या व्यवस्थापनासाठी १८ वर्षाखालील एनएसएस व एनसीसी विद्यार्थ्यांची मदत घेतली जाणार आहे. त्याचप्रमाणे मंडप, बैठक व्यवस्था, पिण्याचे पाणी, मोबाईल प्रसाधनगृह, लाईट, पंखे, व्हिलचेअर, पार्किंग अशा विविध सुविधा पुरविल्या जाणार आहेत.

यावेळी बेलापूर विभागातील १२ व ऐरोली विभागातील २ मोठया सोसायट्यांच्या आवारातच मतदान केंद्रे असणार आहेत, जेणेकरुन नागरिकांना सुविधाजनक व्हावे याकडेही लक्ष देण्यात आले आहे.

मतदानाच्या दिवशी सुट्टी जाहीर केली असल्याने, ती सुट्टी मतदान करण्यासाठी उपयोगात आणावी असेही यावेळी सूचित करण्यात आले. विशेषत्वाने उद्योग समूहात काम करणारे, तसेच हॉटेल्समधील कर्मचाऱ्यांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करावे व त्यांना सूट द्यावी, अशाही सूचना आयुक्तांनी यावेळी दिल्या.

सोसायटी पदाधिकाऱ्यांनी आपल्या सदस्यांना मतदान करण्याविषयी आग्रही करावे, तसेच त्यांच्या घरात काम करणाऱ्या कामगारांना मतदान करण्यासाठी सांगावे व त्याकरिता त्यांना वेळेची सवलत द्यावी, त्याचप्रमाणे परिचितांनाही मतदान करण्यास उत्साहित करावे असेही आयुक्तांमार्फत सूचित करण्यात आले.

मतदान केंद्रामध्ये मोबाईल संच नेण्यास मनाई आहे, याची माहिती नागरिकांमध्ये विविध माध्यमांतून प्रसारित करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. यावेळी सामुहिक मतदार प्रतिज्ञा घेऊन मतदार जनजागृती बैठकीची सांगता झाली.

# शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी महायुतीलाच सत्तेत आणा, काशिनाथ दाते यांचे आवाहन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, पारनेर (अहिल्यानगर) :** महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते सर यांच्या प्रचार गाव भेट दौऱ्याप्रसंगी मतदारांशी थेट संपर्क साधला, यावेळी बोलताना काशिनाथ दाते म्हणाले तालुक्यात बेरोजगारी वाढली आहे. स्थानिक युवकांना एमआयडीसी मध्ये नोकरी मिळाली पाहिजे. रोजगार मिळाला पाहिजे आपल्याला सुसंस्कृत तालुका घडवायचा आहे. म्हणून माझी खरी उमेदवारी आहे.

महायुतीचे सरकार दोन वर्षांपूर्वी राज्यात आल्यानंतर त्यांनी घेतलेले निर्णय तुमच्यासमोर आहे. पहिला लोकप्रिय झालेला निर्णय म्हणजे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण आपण थोडे विचार करा आपण कधी आपल्या महिलेचे बँकेत खाते उघडले का ?



कधी महिलांच्या खात्यावर पैसे टाकले का? परंतु जे काम आपल्याला सुचले नाही ते महायुतीच्या सरकारने करून दाखवले. लाडकी बहिण योजनेचे पैसे देत असताना या तालुक्यात ७० हजार महिलांचे बँकेत खाते उघडली गेली. शासनाने दिवाळीपूर्वी साडेसात हजार खात्यावर दिले आणि हे पैसे कधी काढायचे व खर्च करण्याचा अधिकार माझ्या बहिणींना दिला.

महायुतीचा उमेदवार म्हणून माझ्या लाडक्या बहिणी मला मतदान केल्याशिवाय राहणार नाहीत. महायुती सरकारने शेतकऱ्यांचे कृषी पंपाचे वीज बिल माफ केले ही योजना पुढील पाच वर्षे असणार आहे. सात रुपये लिटर दुधाला अनुदान दिले. एक रुपयात पिक विमा दिला. सर्वात महत्त्वाचं म्हणजे मुलींना पहिलीपासून तर पदवीधर पर्यंत मोफत शिक्षण जाहीर केले असे अतिशय चांगले निर्णय घेतला शेतकरी सन्मान योजनेमुळे अनेकांना फायदा झाला आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आणा,असे आवाहन पारनेर विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांनी केले.

# थोडक्यात

## आराध्य कडूची शालेय राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेमध्ये चमकदार कामगिरी

**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.१३, मुंबई :** ६८ वी भारतीय शालेय क्रीडा प्राधिकरण यांच्या विद्यमाने,शालेय राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धा- २०२४- २५ चे आयोजन विदिशा (मध्यप्रदेश) येथे दि. ७ ते १३ नोव्हेंबर २०२४ दरम्यान संपन्न झाले. या स्पर्धेत महाराष्ट्र (मुंबई उपनगर) च्या पराग शैक्षणिक संकुल, भांडुप शाळेतील इयत्ता ६ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या




१८ किलो खालील वजनी गटात कु.आराध्य अमरनाथ कडू याने चमकदार कामगिरी करत महाराष्ट्राला रौप्य पदक मिळवून दिले. पदक घेताना आराध्यचा विशेष सत्कार नागपूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी निखिल बोबडे यांच्या वतीने करण्यात आला. संपूर्ण पराग शैक्षणिक संकुलातर्फे कु.आराध्य अमरनाथ कडू व पराग विद्यालय क्रीडा शिक्षक रोहित महादेव शिंदे यांच्यावर अभिनंदनाचा व शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

## निवडणूक कर्तव्यावरील कर्मचाऱ्यांचे आजपासून टपाली मतदान

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.१३, हदगांव (नांदेड) :** हदगाव विधानसभा निवडणूकीसाठी कर्तव्यावर असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांरी यांचे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय,तहसील कार्यालय हदगाव येथे सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान होणार आहे ज्यांनी नमुना न १२ फॉम भरुन दिला आहे अशा कर्मचाऱ्यांचे आज दि.१४ ते १८ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत येथील तहसिल कार्यालयात टपाली मतदान आहे.टपाली मतदानाचे काम करून घेण्यासाठी नायब तहसिलदार ए.एम.तामसकर,महेश चामणीकर यांची नियुक्ती करण्यात आली आसून यासाठी तिन पथके तयार करण्यात आली आहेत असे निवडणूक निर्णय अधिकारी अविनाश कांबळे यांनी कळविले आहे.

## कमी मतदान झालेल्या गावात मतदार जनजागृती

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.१३, हदगांव (नांदेड) :** मागील निवडणुकीत ज्या गावात मतदानाची टक्केवारी कमी झाली ती वाढावी म्हणून प्रशासनाच्या वतीने स्विप कक्षाच्या माध्यमातून




हदगाव तालुक्याचे उप विभागीय अधिकारी तथा निवडणुक निर्णय अधिकारी अविनाश कांबळे व तहसीलदार सुरेखा नांदे यांच्या मार्गदर्शनाखाली दि,१३ नोव्हेंबर २४ रोजी हदगाव-हिमायतनगर मतदारसंघांतर्गत स्विप कक्षाच्या वतीने हदगाव तालुक्यांतील मागील मतदान टक्केवारी पाहता ५०टक्यापेक्षा पेक्षा कमी मतदान असलेली व अती संवेदनशील असलेली मतदानकेंद्र तथा गावे याठिकाणी स्विप कक्ष अध्यक्ष किशनराव फोले, सूर्यकांत बाच्छे, सदस्य अरविंद सुर्यवंशी, संदेश चोंडेकर, देवकांबळे उदयकुमार,दत्तात्रय पवळे, सुधाकर औरादकर व सर्व सदस्य यांनी सर्व गाव व अंतर्गत आखाडा-वस्ती बांधव यांना मतदानाचे महत्त्व सांगून जनजागृती करण्या संदर्भात आव्हान व विनंती करण्यात आली व सर्वांना मतदानाची शपथ देण्यात आली यावेळी स्वीप कक्षाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पावसाचे सावट दूर ; बोचऱ्या थंडीची चाहूल

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, (अहिल्यानगर) :** शहर आणि जिल्ह्यात परतीच्या पावसाचे सावटही दूर झाल्याने बोचरी थंडीची चाहूल लागली असून. रात्री ८ नंतर गारवा लागत आहे. दरम्यान, या थंडीवर मात करण्यासाठी ग्रामीण भागात शेकोटी आणि शेकोटीवरील गप्पा सुरू झाल्या आहेत. यंदा पावसाचा मुक्काम वाढल्याने रब्बीच्या पेरण्या लांबल्या असून, आता या राहिलेल्या पेरण्या थंडीच्या कडाक्यातच करावी लागणार आहे. अहिल्यानगरच्या किमान तापमानात घट झाली असली तरी कमाल तापमानात मात्र फारसा काही बदल झालेला नाही, त्यामुळे दिवसा उन्हाचा चटका आणि रात्री गारवा असे शहर व ग्रामीण भागातील चित्र आहे. तर घटक्यात आभाळही येते अन् जाते, निसर्गाच्या या बदलाचा फटका मात्र शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात बसतो आहे. या निसर्गाच्या लहरीपणामुळे पिकांवर नाना प्रकारची विघ्ने येतात आणि बळीराजाचा खर्च वाढत आहे. गेल्या तीन दिवसांपासून कमल तापमानाचा पारा ३४.४ ते ३४.६ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहिला. राज्यात ऑक्टोबर महिन्यात उकाडा वाढला होता. नोव्हेंबर महिना सुरू झाला तरी तापमानात मोठी वाढ नोंदविण्यात आली होती. त्यामुळे थंडी कधी पडणार? असा प्रश्न सर्वांना पडत होता. मात्र, गेल्या काही दिवसांपासून तापमानात मोठी घट पहायला मिळत आहे. दरम्यान पुढील आठवड्यात राज्यात हवामान कोरडे राहण्याची शक्यता असून तापमानात आणखी घट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दरम्यान, पावसाचा मुक्काम वाढल्याने पहाटे थंडीच्या कडाक्यात बळीराजाला तिफणीवर हात ठेवावा लागणार आहे. जिल्ह्यात आता कोठे ४० टक्क्यांपर्यंत रब्बीच्या पेरण्या झाल्या असून, आता हिवाळ्यातच उर्वरित पेरण्या पूर्ण करण्यात येतील.

## सी-व्हिजिल ॲपवरील तक्रारींचे जलदगतीने निराकरण

**दि.१३, ठाणे :** निवडणुकीच्या दरम्यान अनियमितता किंवा आचारसंहिता भंगाविषयी काही आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास नागरिकांना सी व्हिजिलया ॲप्लिकेशनच्या माध्यमातून संदेश, फोटो, व्हिडिओद्वारे ऑनलाईन तक्रार दाखल करण्याची सुविधा निवडणूक आयोगाने उपलब्ध करून देण्यात आली आहे. या ॲपवर तक्रार प्राप्त झाल्यापासून १०० मिनिटांच्या आत तक्रारीचे निवारण केले जाते.या अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात दि.१३ नोव्हेंबर २०२४ दुपारी ३:३० वाजेपर्यंत १ हजार ०८ तक्रारी प्राप्त झाल्या. या १ हजार ०८ तक्रारींमध्ये एकूण ९२३ तक्रारी दखलपात्र असून उर्वरित ८५ तक्रारी अदखलपात्र आहेत. या ९२३ दखलपात्र तक्रारींमधून ८७० तक्रारींचे १०० मिनिटांच्या आत निराकरण करण्यात आले असून उर्वरित तक्रारींचेही निराकरण करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही सुरू आहे, अशी माहिती सी-व्हिजिल कक्षाचे जिल्हास्तरीय समन्वय अधिकारी विजयसिंह देशमुख व सहाय्यक समन्वय अधिकारी सुकेशिनी पगारे यांनी दिली आहे.